**जा.क्र.पोआ/४७८७ /२०२१**
**पिंपरी चिंचवड**
**दिनांक  १९.०४.२०२१**

**विषय :-  कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "**(Break The Chain)**"**
**प्रतिबंधात्मक आदेश...**

**संदर्भ : -** १) शासन परिपत्रक क्रमांक - समय २०२०/प्र.क्रं.३५/१८ (रा.व का.) दिनांक ०७.०४.२०२०
२) मा.विभागीय आयुक्त (पिंपरी चिंचवड) कार्या.क्रासा.प्र.१/आर आर/१०२४/२०२० यांचे दिनांक
२८.०८.२०२० रोजीचे पत्र
३) अधिसुचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय मुंबई,
क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-०५,दिनांक १४ मार्च २०२०
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६) महाराष्ट्र शासन आदेश क्र. महसुल व वन विभाग (**DMU/2020/CR.92/DISM,1**)
दिनांक १३ एप्रिल २०२१
७) पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्रं.वैद्य/०९/कावि/१३१७/२०२१, दिनांक १७.०४.२०२१

-----ooo-----

ज्याअर्थी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन) आणि कोरोना विषाणु संसर्ग साखळी तोडण्यासाठी (ब्रेक द चेन) संदर्भात कोविड-१९ या विषाणुच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांअतर्गत राज्यात कोरोना विषाणुमूळे उदभवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड आयुक्तलयाच्या क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांना प्राधिकृत केलेले आहेत. साथरोग अधिनियम १९८७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी कृष्ण प्रकाश पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पिंपरी चिंचवड** आयुक्तालयाच्या संपुर्ण कार्यक्षेत्रासाठी खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

**१.** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात मे.महाराष्ट्र शासनाने या आत्यावश्यक सेवेशी संबंधित उत्पादन करणा-या कंपन्यांना परवानगी दिलेली आहे. अश्या कंपन्यांना आवश्यक मालाचा पुरवठा करणारी दुकाने केवळ त्याच कारणासाठी सुरु ठेवता येतील. त्यांना इतर किरकोळ विक्री करता येणार नाही. त्यांनी Point To Point विक्री करावी.

**२.** खालील आथापनावरिल कर्मचा-यांना कोविड - १९ (RTPCR / RAT)चाचाणी करणेपासून सुट देण्यात येत आहे.

- ई-कॉमर्स मार्फत घरपोच सुविधा देणारे कर्मचारी

- हाटेल, बार,रेटॉरंट यांचे कर्मचारी तसेच त्यांचे मार्फत घरपोच सुविधा देणारे कर्मचारी
- खाजगी वाहतुक करणारे वाहन चालक / मालक
- दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालीन मासिके, साप्ताहीके इ.ची छपाई व वितरण करणारे कमचारी
- घरगुती काम करणारे कामगार, वाहन चालक, स्वयंपाकी, जेष्ठ नागरिक आणि घरी आजारी असणा-या लोकांना सेवा देण्यासाठी वैद्यकीय मदतनीस / नर्स
- तथापी त्यांनी भारत सरकारव्दारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे.

**३.** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रातील खानावळी (मेस) या फक्त पार्सल सेवेसाठी सर्व दिवस सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०८.०० या वेळेत सुरु राहतील.

**४.** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रातील मद्य विक्रीची दुकाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमाप्रमाणे होम डिलीव्हरी सुविधा सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत सुरु राहतील.

**५.** चष्म्याची दुकाने सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत सुरु राहतील.

**६.** संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील. केंद्र सरकार /महाराष्ट्र शासन /पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि या कार्यालयाव्दारे यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोव्हिड १९ च्या प्रतिबंधासाठी केंद्र सरकार / महाराष्ट्र शासन / जिल्हाधिकारी कार्यालय / पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि या कार्यालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करणा-या व्यक्तींवर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतील दंड संहितेचे कलम १८८ नुसार, साथीचेरोग नियंत्रण कायदा व अन्य कायदेशिर तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश दिनांक १७.०४.२०२१ रोजी पासून पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक .०४.२०२१ रोजी दिलेला आहे.

**(कृष्ण प्रकाश)**
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :- १९**.०४.२०२१